Pune Police

## प्रेसनोट दि. ०७/११/२०१७

### सराईत गुन्हेगारांविरूध्द खंडणीचा गुन्हा दाखल

फिर्यादी नामे शहा एजाज सर्फउद्दीन, वय-३२ वर्षे, व्यवसाय- इस्टेट एजंट, रा. प्रोव्हीजो अपार्टमेंट फ्लॅट नं. १०, स.नं. ४६ कोंढवा खुर्द, पुणे यांनी त्यांचे भागीदार नामे अकील बाबुमीयाँ सय्यद वगैरे चार जणांच्या भागीदारीत कोंढवा स.नं. ४३ येथे इमारत विकसीत करण्याचे काम चालु आहे.

आरोपी इसम नामे १) रियाज रहीम बंगाली २) अमीन शेख ३) अकबर अब्दुल करीम शेख ऊर्फ अकबर चावी ४) रफिक थापा या सर्वांनी मिळून, संगनमत करून वर नमुद श्री. शहा एजाज सर्फउद्दीन यांना १० लाख रूपयांची खंडणी मागितली. नाहीतर इमारत पाडून त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. दि. २८/१०/२०१७ रोजी २१:०० वा. श्री. शहा एजाज सर्फउद्दीन यांनी रियाज बंगाली व इतरांना हॉटेल करीम, कौसरबाग, कोंढवा येथे भितीपोटी २ लाख रूपये रोख स्वरूपात दिलेले आहेत. त्यांनी वगैरे सविस्तर फिर्याद श्री. शहा एजाज सर्फउद्दीन यांनी दि. ०६/११/२०१७ रोजी दिल्याने त्या बाबत कोंढवा पो.स्टे. येथे गु.र.नं. ४४७/१७ भा.दं.वि.क. ३८६,३८७,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. वर नमुद गुन्ह्याचा तपास चालु आहे.

